# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.03.2025** **वारःसोमवार**

---

आयसीसी चँपिअन्स करंडकावर भारतीय संघाची मोहोर

राष्ट्रपती हरियाणा, चंदीगड आणि पंजाबच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर

भारत आणि युरोपीय संघांदरम्यान ब्रुसेल्यमध्ये व्यापार करारासाठी आज दहावी बैठक आणि

मध्यप्रदेशमध्ये आज माधव राष्ट्रीय उद्यानाचं उद्घाटन

**<u>आयसीसी-चँपिअन्स-करंडक</u>**

आयसीसी चँपिअन्स करंडकावर भारतीय संघानं १२ वर्षानंतर आपलं नाव कोरलं. काल दुबई इथं झालेल्या सामन्यात भारतानं न्यूझिलंड संघाचा चार गडी राखून पराभव केला. ही स्पर्धा तीन वेळा जिंकणारा भारत हा एकमेव संघ आहे. न्यूझिलंडनं दिलेलं २५२ धावांच्या आव्हानाचा सामना करताना भारतानं आक्रमक सुरुवात केली. पहिला गडी बाद होण्यापुर्वी शुभमन गील आणि रोहित शर्मानं १०५ धावांची भागीदारी रचली. मिचेल सँटनरच्या गोलंदाजीवर ग्लेन फिलिप्सने शुभमनचा झेल टिपला. विजयासाठी श्रेयस, राहुल आणि अक्षर पटेलनं महत्वाची भागीदारी केली. कर्णधार रोहित शर्माला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आलं आणि न्यूझीलंडचा खेळाडू रचिन रवींद्रला मालिकावीराचा किताब मिळाला. न्यूझीलंडकडून मिचेल सँटनर आणि मायकेल ब्रेसवेल यांनी प्रत्येकी दोन तर काइल जेमीसन आणि रचिन रवींद्र यांनी प्रत्येकी एक गडी बाद केले.

तत्पूर्वी, नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेत, न्यूझीलंडनं निर्धारित ५० षटकांत ७ बाद २५१ धावा केल्या. न्यूझीलंडकडून डॅरिल मिशेलने ६३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांनी या विजयाबद्दल भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे.

**<u>अर्थसंकल्पीय-अधिवेशन</u>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं दुसरं सत्र आजपासून सुरु होणार आहे. ४ एप्रिलपर्यंत चालणाऱ्या या सत्रात एकंदर २० बैठका होतील. अर्थमंत्री निर्मला सीतारमण आज मणिपूरसाठीचा अर्थसंकल्प सादर करतील. गेल्या महिन्यात मुख्यमंत्री एन बीरेन सिंग यांनी राजीनामा दिल्यानंतर मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे. 2025-26 या वर्षासाठीचं विनियोजन विधेयक चर्चेसाठी पटलावर ठेवण्यात येणार आहे. तसंच तटीय व्यापार विधेयक 2024, स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक

2025, रेल्वे सुधारणा विधेयक आदी विधेयकं पटलावर मांडली जाणार आहेत. ३१ मार्च ते १३ फेब्रुवारी याकालावधीत पार पडलेल्या पहिल्या सत्रांत ११२ टक्के कामकाजाची नोंद झाली आहे.
महाराष्ट्र  राज्याचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये सादर होणार आहे. महायुती सरकार पुन्हा सत्तेत आल्यानंतरचा हा पहिलाच अर्थसंकल्प असेल. अर्थमंत्री अजित पवार आधी विधानसभेत आणि त्यानंतर विधानपरिषदेत हा अर्थसंकल्प सादर करतील.

**मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या मंगळवारपासून दोन दिवसांच्या मॉरिशस दौऱ्यावर जाणार आहेत. मॉरिशसच्या राष्ट्रीय दिन समारंभाला ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. मॉरिशसच्या दोन दिवसांच्या दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मॉरिशसचे पंतप्रधान तिथल्या विविध प्रकल्पांचं उद्घाटन करणार आहेत. या प्रकल्पांमध्ये सिव्हिल सर्व्हिस कॉलेज आणि विभागीय आरोग्य केंद्राचा समावेश आहे. हे प्रकल्प भारताच्या मदतीनं उभारण्यात आले आहेत. भारत आणि मॉरिशस यांच्यात मजबूत, गतिशील आणि द्विपक्षीय संबंध आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या दौऱ्यामुळे दोन्ही देशांमधील हे मजबूत संबंध अधिक दृढ होतील आणि हे संबंध नव्या उंचीवर नेण्यास मदत होईल, असं मॉरिशसमधील भारताचे उच्चायुक्त अनुराग श्रीवास्तव यांनी आकाशवाणीला सांगितलं.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून हरियाणा, चंदीगड आणि पंजाबच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. त्यांच्या दौऱ्याच्या पहिल्या दिवशी, राष्ट्रपती हिसार इथं गुरु जंभेश्वर विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहतील. तसंच ब्रह्माकुमारींच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्यानिमित्त 'समग्र कल्याणासाठी आध्यात्मिक शिक्षण' या राज्यस्तरीय मोहिमेचा शुभारंभ करतील.

उद्या, राष्ट्रपती पंजाब केंद्रीय विद्यापीठ आणि भटिंडा इथल्या एम्सच्या दीक्षांत समारंभ, मोहाली इथं पंजाब सरकारने आयोजित केलेल्या नागरी स्वागत समारंभ, आणि बुधवारी, राष्ट्रपती चंदीगड येथील पंजाब विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहतील.

**भारत**

भारत आणि युरोपीय संघांदरम्यान ब्रुसेल्समध्ये व्यापार करारासाठी आज दहावी बैठक होणार आहे. व्यापार करारासंदर्भातील उर्वरीत मुद्यावर यावर्षीच्या अखेरपर्यंत सहमती होण्याची अपेक्षा  आहे. युरोपियन संघटनेचे व्यापार आणि आर्थिक सुरक्षा आयुक्त मारोस सेफकोविक यांच्या अलिकडच्या भेटीदरम्यान, दोन्ही गटांदरम्यान संतुलित आणि परस्पर हिताच्या असलेल्या विविध करारांना अंतिम रुप देण्याच्या प्रयत्नांना गती देण्याच्या दृष्टीनं चर्चा झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील प्रशासनाच्या वतीनं शुल्क वाढ करण्याच्या प्रस्तावाच्या पार्श्वभूमीवर या बैठकीकडे पाहिलं जात आहे.  पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांनी

गेल्या महिन्यात भारत-युरोपियन युनियन मुक्त व्यापार करार या वर्षापर्यंत पूर्ण करण्याचे मान्य केले होते.

**<u>कार्नी</u>**

कॅनडामधील माजी मध्यवर्ती बँकर मार्क कार्नी यांची सत्ताधारी लिबरल पक्षानं  कॅनडाच्या नेतेपदी निवड केली असून त्यामुळे ते कॅनडाचे पुढचे पंतप्रधान बनणार असल्याचं  निश्चित झालं  आहे. येत्या काही दिवसांत ते पंतप्रधानपदाची शपथ घेतील. ५९ वर्षीय कार्नी हे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांची जागा घेतील. ट्रूडो  यांनी जानेवारीमध्ये राजीनामा देण्याची घोषणा केली होती.

कार्नी यांनी यापूर्वी बँक ऑफ कॅनडाचे गव्हर्नर म्हणून काम केलं असून २०१३ मध्ये बँक ऑफ इंग्लंडचे नेतृत्व करणारे ते पहिले विदेशी नागरिक बनले. अमेरिकेद्वारे घोषित व्यापारयुद्धाच्या पार्श्वभूमीवर कार्नी यांच्याकडे देशाचं  नेतृत्व आलं  आहे. आपल्या भाषणात कार्नी म्हणाले की, कॅनडाला काळ्या दिवसांचा सामना करावा लागत आहे, अमेरिकन लोक आदर दाखवत नाहीत तोपर्यंत अमेरिकेच्या वस्तूंवरील प्रत्युत्तरात्मक शुल्क कायम ठेवण्याचं आश्वासनही त्यांनी दिले.

**<u>MP</u>**

मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव आज राज्यातील नवव्या व्याघ्र प्रकल्पाचे अर्थात माधव राष्ट्रीय उद्यानाचं उद्घाटन करतील. या उद्यानाच्या आतल्या भागात १३ किलोमीटर लांबीच्या दगडी सुरक्षा भिंतीचंही ते उद्घाटन करतील. या प्रकल्पाला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री यादव यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. हे देशातील पट्टेदार वाघांसाठीचं अठ्ठावनावं संरक्षित उद्यान असेल. शिवपुरी जिल्ह्यात असलेलं हा व्याघ्र प्रकल्प वन्यजीव संवर्धन आणि पर्यटनाला प्रोत्साहन देईल. अशी आशा यादव यांनी व्यक्त केली.

**<u>इराण</u>**

अमेरिकेबरोबरची चर्चा इराणच्या अणुकार्यक्रमाच्या लष्करीकरणाबाबतच्या मुद्यांवर मर्यादित राहिली तर ते अमेरिकेशी वाटाघाटी करण्याचा विचार करतील. असं इराणने काल सांगितलं. इराणसाठी असलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या मिशनने एक्स माध्यमावरील संदेशांत म्हटले आहे की, जर वाटाघाटींचा उद्देश इराणच्या अणुकार्यक्रमाच्या कोणत्याही संभाव्य लष्करीकरणाबाबतच्या चिंता दूर करणे असेल, तर अशा चर्चा विचारात घेतल्या जाऊ शकतात. अमेरिकेचा उद्देश इराणच्या क्षेपणास्त्र कार्यक्रमावर आणि त्या प्रदेशातील त्याच्या प्रभावावर निर्बंध लादणे असेल तर आपण कोणतीही चर्चा करणार नसल्याचं एक दिवस आधी, इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी स्पष्ट केलं होतं. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तेहरानशी वेगाने वाढणाऱ्या अणुकार्यक्रमाला आळा घालण्यासाठी आणि त्यांच्या पहिल्या कार्यकाळात अमेरिकेला मागे घेतलेल्या अणुकराराची जागा घेण्यासाठी नवीन करार करण्याची मागणी करणारे पत्र पाठवल्याची कबुली दिल्यानंतर खोमेनी यांचे हे विधान आलं आहे.

**सिरीया**

संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार उच्चायुक्त व्होल्कर तुर्क यांनी सीरियामध्ये नागरिकांच्या हत्येचा तीव्र निषेध केला आहे, सामान्या नागरिकांच्या हत्येची संपूर्ण चौकशी करण्याची आणि जबाबदार असलेल्यांवर खटला चालवण्याची मागणी केली आहे. तुर्क यांनी सिरीयाच्या प्रशासकीय पातळीवर एक व्यापक आणि विश्वासार्ह न्याय प्रक्रिया स्थापन करण्याचे आवाहन केलं आहे. गेल्या गुरुवारी सीरियाच्या लताकिया आणि टार्टस प्रांतात सीरियाच्या सुरक्षा दल आणि दमास्कसमधील नवीन सरकारला विरोध करणाऱ्या सशस्त्र गटांमध्ये हिंसक संघर्ष झाला. सीरियाचे संक्रमणकालीन अध्यक्ष अहमद शारा यांनी लताकिया आणि टार्टसमधील सशस्त्र गटांना शस्त्रे खाली ठेवण्याचे आवाहन केल आहे. देशाच्या संरक्षण मंत्रालयाने या प्रदेशाकडे जाणारे रस्ते बंद करण्याची घोषणा केली.

**भारत**

भारत-किर्गिस्तान संयुक्त विशेष दल सराव खंजार ची १२ वी आवृत्ती आजपासून किर्गिस्तानमध्ये सुरू होत आहे. १४ दिवसांचा हा संयुक्त सराव या महिन्याच्या २३ तारखेपर्यंत सुरू राहील. शहरी आणि पर्वतीय उंच भूप्रदेशात दहशतवादविरोधी आणि विशेष दलांच्या ऑपरेशन्समधील अनुभव आणि सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण करणे हा या सरावाचा उद्देश आहे.

**जम्मू आणि काश्मीर**

जम्मू आणि काश्मिरमध्ये कथुआ जिल्ह्यात एकाच कुटुंबातील ३ जणांचे मृतदेह सापडले. या प्रकरणाच्या चौकशीसाठी पोलीसांकडून एका दलाची स्थापना करण्यात आली असून या प्रकणाचा कसून तपास करण्यात येईल अशी ग्वाही जम्मू कथुआ सांबा भागाचे पोलिस उपमहानिरीक्षक शिवकुमार यांनी दिली. ५ मार्च रोजी एका लग्न समारंभातून ३ जण बेपत्ता झाले होते, त्यांचे मृतदेह मलहार भागातील इशू नालानजिक आढळून आले आहेत. कठुआचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक शोबित सक्सेना आणि सैन्य अधिकाऱ्यांचे सहायक विनय खोसला यांच्यासमवेत, पोलिस उपमहानिरीक्षक यांनी बिल्लावार इथं स्थानिकांची भेट घेऊन, सुरक्षा व्यवस्था आणखी मजबूत केली जाईल असं आश्वासन दिलं. लष्कर आणि निमलष्करी दलांसह, पोलिस, विशेष अभियानासाठीचा गट आणि कर्मचारी यापुर्वीच या परिसराची सुरक्षेसाठी घटनास्थळी दाखल झाले आहेत. अशी माहिती उपमहानिरीक्षकांनी दिली.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**